**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-** राम धोंडीराम क्षीरसागर , **वय:-**४३ वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी , **रा.**किनगाव**, ता.**अहमदपूर **जि**.लातूर.

ह.मु.रजियामंजील हाऊस नं.२०, वॉटर टँक रोड थेवरा, कोचीन

पिन.क्रं.६८२०१३.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने सुरु.</u>**

**१.** मी वादी व प्रतिवादींना ओळखतो. २००२ ते २००८ पर्यंत मी वादीकडे जे.सी.बी. चालक म्हणून कार्यरत होतो. मुकुंद हडबे, तुकाराम येदले हे आणखी दोन व्यक्ती त्यांच्याकडे कामाला होते. मुकुंद हडबे हे मुनीम व चालक होते. तुकाराम येदले हे वायरमॅन, फिटर, मोटर मेकॅनिक होते. मला वादी व प्रतिवादीची शेती माहिती आहे. मी जे.सी.बी च्या मदतीने डाळींबसाठी खड्डे खोदणे, चा-या काढणे, भूमीगत नाल्या तयार करणे, कपाऊंडसाठी खड्डे खोदणे असे काम तिथे असताना करायचा. डाळींब लागवड साधारण ७० ते ८० एकर मध्ये असल्याने तिथे मी हे काम केले. तार कुंपणाचे साहित्य लातूर मधील चितकोटे यांच्याकडून आणले होते. मी तेथील पाईपलाईनसाठी खोदकाम केले होते. किनगाव तळयातून शेतापर्यंत ही पाईपलाईन होती. पाच इंची दोन पाईपलाईन यासाठी हे काम होते. डाळींबाच्या ड्रिपसाठी सुध्दा मी खोदकाम केले. वादीने कोठारी कंपनीतून सदर पाईप मागवले होते. वादी व त्यांचे भाऊ बालाजी देपे, प्रभू उर्फ संभाजी देपे यांच्यात शेतात काम केले. बालाजी आणि प्रभू हे मला तिथे भेटत. डाळींबाची लागवड ६०-७० एकरात वादीने केली होती. डाळींबाचे रोप बापू पाटील नावाच्या व्यक्तीकडून नाशिकहून आणले होते. सटाण्यातील समाधान सावकार हे डाळींब पिकाच्या लागवडीपासून त्यांना मार्गदर्शन करत होते. बापू हे समाधान सावकार यांच्यावर Supervision करीत. डाळींबाची छाटणी, फवारणी अशी कामे सटाण्यातील संतोष असा माणूस करायचा. आमचे वास्तव्य तिथेच असायचे. आम्हाला राहण्याची, जेवण खाण्याची सोय वादीने करुन

दिली होती. डाळींब पिकाचे उत्पादनसुध्दा मी पाहिलेले आहे. मी डाळींब दिल्लीलासुध्दा विकायला गेलो होतो. सफरचंद, डाळींब याचे दिल्लीतील मुख्य बाजारपेठेत मी डाळींब विकायला गेलो होतो. त्या मंडीचे नाव मला आठवत नाही. वादी हे डाळींब पिकात अंतरपिक म्हणून कांदा पीक घेत असत. किनगाव साठवण तलावातील पाईपलाईन करत असताना मी, हडबे, जोंधळे यांच्याविरुध्द डॉ.वारद यांनी फौजदारी खटला केला होता. त्यांचया रानातून पाईपलाईन काढण्यासाठी चर खणल्याने त्यांनी आमच्याविरुध्द खटला केला. पोलीसांनी आम्हांला आमच्या मशीनरीसहीत पोलीस ठाण्यामध्ये नेले होते. संभाजी किंवा बालाजी देपे यांच्याविरुध्द कोणीही गुन्हा दाखल केला नव्हता. पाईपलाईन वादीची होती. वादजमीनीसहीत व अन्यत्र त्या भागात कोणाचीही डाळींब लागवड नव्हती. राहुल देपे, त्यांचे वडील किंवा त्यांचे नोकरचाकर यांनी डाळींब पिकाची उपर्जना केली किंवा त्याचे उत्पादन विक्रीस नेले असे मी स्वत कधीही पाहिले नाही. माझे आई-वडील किनगाव येथे राहतात. मी राहुल देपे यांना ओळखतो. राहुल याने मला किंवा माझ्या आई-वडीलांना नजीकच्या भूतकाळात या साक्षीवरुन काही बोलला किंवा कसे असे घडलेले नाही. २००७-२००८ सालापर्यंत हा राहूल कॉलेजात जात होता. त्याचा भाऊ तानाजी हा शिक्षक होता. संभाजी यांना कर्करोग होता. बालाजी हे सुध्दा शिक्षक होते.

**सरतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक ०५/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.